Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

भारताच्या संरक्षण उत्पादन व निर्यात वाढीमध्ये आत्मनिर्भर भारत अभियानाचे योगदान

पूजा गोकुळ देवरे
सहाय्यक प्राध्यापक, संरक्षणशास्त्र विभाग,
गंगामाई एज्युकेशन ट्रस्ट संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागाव, ता. धुळे, जि. धुळे
Email: deorepooja96@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180730
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 148-152
July- 2026
Submitted: 16 June. 2026
Revised: 26 June. 2026
Accepted: 11 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सक्षम आणि स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने भारत सरकारने *2020* मध्ये आत्मनिर्भर भारत अभियान सुरू केले. प्रस्तुत संशोधनामध्ये भारताच्या संरक्षण धोरणात आत्मनिर्भर भारत अभियानाचे योगदान विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून अभ्यासण्यात आले आहे. या संशोधनासाठी संरक्षण मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, संरक्षण उत्पादन विभागाचे दस्तऐवज, *DRDO*, *HAL*, *BEL*, *BDL* यांचे अहवाल, प्रेस माहिती ब्युरो (*PIB*), *SIPRI* डेटाबेस तसेच समकक्ष-समीक्षित संशोधन लेख आणि सरकारी दस्तऐवज या द्वितीयक स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीचे वर्णनात्मक, तुलनात्मक आणि प्रवृत्ती विश्लेषण करण्यात आले. अभ्यासातून संरक्षण उत्पादन, संरक्षण निर्यात, स्वदेशीकरण आणि संरक्षण उद्योगातील खाजगी क्षेत्राचा सहभाग यामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले. तसेच *DAP-2020*, *Positive Indigenisation Lists*, *iDEX* आणि इतर धोरणात्मक उपक्रमांमुळे भारताची संरक्षण क्षमता आणि धोरणात्मक स्वायत्तता अधिक बळकट झाली आहे. तथापि, अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, संशोधन व विकास आणि उच्च तंत्रज्ञानातील स्वावलंबनासाठी अधिक गुंतवणूक आवश्यक असल्याचेही आढळून आले. एकूणच, आत्मनिर्भर भारत अभियान हे भारताच्या संरक्षण क्षेत्रातील दीर्घकालीन स्वावलंबन आणि राष्ट्रीय सुरक्षा बळकट करण्यासाठी प्रभावी धोरणात्मक उपक्रम असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

मुखशब्द: आत्मनिर्भर भारत अभियान, संरक्षण धोरण, राष्ट्रीय सुरक्षा, संरक्षण उत्पादन, संरक्षण,निर्यात, स्वदेशीकरण

प्रस्तावना

राष्ट्रीय सुरक्षा ही कोणत्याही सार्वभौम राष्ट्राच्या अस्तित्व, प्रादेशिक अखंडता, राजकीय स्थैर्य आणि शाश्वत विकासाचा मूलभूत आधार मानली जाते. 21 व्या शतकात जागतिक भू-राजकीय स्पर्धा, सीमावाद, दहशतवाद, सायबर हल्ले, कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश तंत्रज्ञान आणि हायब्रिड युद्ध यांसारख्या नव्या सुरक्षाविषयक आव्हानांमुळे संरक्षण धोरणाचे स्वरूप अधिक व्यापक आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना केवळ सैनिकी शक्तीपुरती मर्यादित न राहता आर्थिक स्वावलंबन, औद्योगिक क्षमता, तांत्रिक नवोपक्रम, संरक्षण संशोधन आणि धोरणात्मक स्वायत्तता (Strategic Autonomy) यांच्याशी घनिष्ठपणे जोडली गेली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने आपल्या संरक्षण धोरणात स्वदेशीकरण, संरक्षण उत्पादन क्षमता वाढविणे आणि आधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचा विकास यांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे (Ministry of Defence, 2020). कोविड-19 महामारीनंतर जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्यय, बदलते आंतरराष्ट्रीय सामरिक संबंध आणि संरक्षण उपकरणांच्या आयातीवरील अवलंबित्वामुळे स्वदेशी संरक्षण उद्योग उभारण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवू लागली.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
पूजा गोकुळ देवरे, सहाय्यक प्राध्यापक, संरक्षणशास्त्र विभाग, गंगामाई एज्युकेशन ट्रस्ट संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागाव, ता. धुळे, जि. धुळे.

How to cite this article:
देवरे, पूजा. गोकुळ. (2026). भारताच्या संरक्षण उत्पादन व निर्यात वाढीमध्ये आत्मनिर्भर भारत अभियानाचे योगदान. Journal of Research and Development, 18(7), 148–152.
https://doi.org/10.5281/zenodo.21944051

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21944051
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

या पार्श्वभूमीवर भारत सरकारने मे 2020 मध्ये 'आत्मनिर्भर भारत अभियान' सुरू केले. या अभियानांतर्गत संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी Defence Acquisition Procedure (DAP-2020), Positive Indigenisation Lists, Innovations for Defence Excellence (iDEX), Srijan Portal, संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर आणि Make in India यांसारख्या विविध धोरणात्मक उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. या सुधारणांमुळे संरक्षण क्षेत्रात सार्वजनिक उपक्रमांसह खाजगी उद्योग, MSMEs, स्टार्टअप्स आणि संशोधन संस्थांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला असून भारताचा संरक्षण औद्योगिक पाया अधिक मजबूत होत आहे.

भारत दीर्घकाळ जगातील सर्वाधिक संरक्षण आयात करणाऱ्या देशांपैकी एक राहिला आहे. अत्याधुनिक लढाऊ विमाने, पाणबुड्या, क्षेपणास्त्र प्रणाली, रडार आणि इतर संरक्षण उपकरणांसाठी परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून राहिल्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेबरोबरच परकीय चलनावरही मोठा ताण निर्माण झाला. या परिस्थितीत संरक्षण क्षेत्रातील स्वदेशीकरण ही केवळ आर्थिक गरज नसून राष्ट्रीय सुरक्षेची अपरिहार्य रणनीती ठरली आहे. संरक्षण संशोधन व विकास संस्था (DRDO), हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL), भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (BEL), भारत डायनॅमिक्स लिमिटेड (BDL) तसेच खाजगी उद्योगांच्या सहकार्याने स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्यात आले आहेत. यामुळे स्वदेशी संरक्षण उत्पादन, संशोधन, नवोपक्रम आणि संरक्षण निर्यातीत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. अलीकडील अधिकृत आकडेवारीनुसार, भारताचे संरक्षण उत्पादन आर्थिक वर्ष 2025–26 मध्ये विक्रमी ₹1.78 लाख कोटी इतके झाले असून 2020–21 च्या तुलनेत त्यात 110 टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. याच कालावधीत संरक्षण निर्यातही विक्रमी ₹38,424 कोटी इतकी झाली असून भारतीय संरक्षण उत्पादने 80 पेक्षा अधिक देशांमध्ये निर्यात केली जात आहेत. पूर्वी संरक्षण उपकरणांपैकी सुमारे 65–70 टक्के उपकरणे आयात केली जात होती; मात्र आता जवळपास 65 टक्के संरक्षण उपकरणे देशांतर्गत उत्पादित केली जात आहेत. तसेच संरक्षण उत्पादनात खाजगी क्षेत्राचा सहभागही सातत्याने वाढत असून भारत संरक्षण आयातदार देशापासून संरक्षण उत्पादन व निर्यातक्षम राष्ट्राकडे वाटचाल करीत आहे. जुलै 2026 मध्ये कारगिल विजय दिनाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी स्वदेशी युद्धनौका INS Mahendragiri, DRDO च्या Pinaka आणि Kusha प्रणालींचा उल्लेख करून संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेला भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ असल्याचे अधोरेखित केले. या घडामोडी भारताच्या संरक्षण धोरणात स्वदेशी तंत्रज्ञान, संशोधन आणि संरक्षण उत्पादनाला मिळालेल्या प्राधान्याचे प्रतीक मानल्या जातात.

या पार्श्वभूमीवर "भारताच्या संरक्षण धोरणात आत्मनिर्भर भारत अभियानाचे योगदान : एक विश्लेषणात्मक अभ्यास" हा संशोधन विषय अत्यंत समकालीन, धोरणात्मक आणि संशोधनदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत संरक्षण क्षेत्रात राबविण्यात आलेल्या विविध धोरणांचे, स्वदेशी संरक्षण उत्पादनातील प्रगतीचे, आयात अवलंबित्वातील बदलांचे, संरक्षण निर्यातीतील वाढीचे तसेच राष्ट्रीय सुरक्षेवरील परिणामांचे चिकित्सक विश्लेषण करण्यात येईल. या अभ्यासाचे निष्कर्ष संरक्षण धोरणनिर्माते, संशोधक, संरक्षण उद्योग, विद्यार्थी आणि राष्ट्रीय सुरक्षा अभ्यासक यांच्यासाठी उपयुक्त ठरतील.

समस्या विधान

भारत हा दीर्घकाळ संरक्षण उपकरणांच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेला देश राहिला आहे. आधुनिक लढाऊ विमाने, क्षेपणास्त्र प्रणाली, पाणबुड्या, रडार, संप्रेषण उपकरणे आणि इतर अत्याधुनिक संरक्षण साहित्याच्या खरेदीसाठी परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबित्व असल्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेसोबतच आर्थिक संसाधनांवरही मोठा ताण निर्माण झाला. जागतिक भू-राजकीय बदल, पुरवठा साखळीतील व्यत्यय, तंत्रज्ञानावरील निर्बंध आणि संरक्षण साहित्याच्या उपलब्धतेतील अनिश्चितता यांमुळे संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनाची आवश्यकता अधिक तीव्रतेने जाणवू लागली.

या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने 2020 मध्ये 'आत्मनिर्भर भारत अभियान' अंतर्गत संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादन, संशोधन व विकास, संरक्षण नवोपक्रम, खाजगी क्षेत्राचा सहभाग, संरक्षण निर्यात वाढ आणि आयात अवलंबित्व कमी करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण धोरणात्मक सुधारणा राबवल्या. Defence Acquisition Procedure (DAP-2020), Positive Indigenisation Lists, Innovations for Defence Excellence (iDEX), संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर, Srijan Portal आणि Make in India यांसारख्या उपक्रमांमुळे भारतीय संरक्षण उद्योगाच्या विकासाला गती मिळाली आहे. तथापि, या धोरणांची प्रत्यक्ष परिणामकारकता, स्वदेशी संरक्षण उत्पादनातील वाढ, संरक्षण निर्यातीतील प्रगती, तंत्रज्ञान विकास, खाजगी उद्योगांचा सहभाग आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील दीर्घकालीन परिणाम यांचे सर्वंकष मूल्यांकन अद्याप मर्यादित प्रमाणात झाले आहे.र्यादित प्रमाणात झाले आहे.

याशिवाय, संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनाच्या दिशेने झालेल्या प्रगतीबरोबरच अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधनातील गुंतवणूक, कुशल मनुष्यबळ, जागतिक स्पर्धा, संरक्षण उत्पादनाची गुणवत्ता, पुरवठा साखळी व्यवस्थापन आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी यांसारखी अनेक आव्हाने अद्याप कायम आहेत. त्यामुळे आत्मनिर्भर भारत अभियानामुळे भारताच्या संरक्षण धोरणात नेमके कोणते संरचनात्मक बदल झाले, संरक्षण उत्पादन व निर्यातीत कितपत वाढ झाली, आयात अवलंबित्व किती कमी झाले आणि राष्ट्रीय सुरक्षेला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

त्याचा कितपत लाभ झाला, याचा वस्तुनिष्ठ व विश्लेषणात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. "भारताच्या संरक्षण धोरणात आत्मनिर्भर भारत अभियानाचे योगदान: एक विश्लेषणात्मक अभ्यास" या संशोधनाद्वारे आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या संरक्षणविषयक धोरणांचे, स्वदेशी संरक्षण उत्पादनातील प्रगतीचे, तंत्रज्ञान विकासाचे, संरक्षण निर्यातीतील वाढीचे आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील परिणामांचे चिकित्सक विश्लेषण करण्यात येणार आहे. या संशोधनातून भारताच्या संरक्षण क्षेत्रातील स्वावलंबनाच्या यश, मर्यादा, आव्हाने आणि भविष्यातील धोरणात्मक दिशा स्पष्ट होण्यास मदत होईल.

संशोधनाची उद्दिष्टे

आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत भारताच्या संरक्षण क्षेत्रात राबविण्यात आलेल्या स्वदेशीकरण धोरणांचा आणि संरक्षण उत्पादनातील प्रगतीचा अभ्यास करणे.

- आत्मनिर्भर भारत अभियानाचा भारताच्या संरक्षण उत्पादन, संरक्षण निर्यात आणि राष्ट्रीय सुरक्षेवर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करणे.

गृहीतके

आत्मनिर्भर भारत अभियानाच्या अंमलबजावणीनंतर भारताच्या संरक्षण उत्पादनात आणि स्वदेशीकरणाच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे.

- आत्मनिर्भर भारत अभियानामुळे संरक्षण निर्यातीत वाढ होऊन भारताची संरक्षण क्षमता आणि धोरणात्मक स्वायत्तता (Strategic Autonomy) अधिक बळकट झाली आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती पूर्णतः द्वितीयक स्रोतांमधून संकलित करण्यात आली आहे. यामध्ये भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, संरक्षण उत्पादन विभागाचे अहवाल, संरक्षण संपादन प्रक्रिया (DAP–2020), संरक्षण उत्पादन व निर्यात प्रोत्साहन धोरण (DPEPP–2020), संरक्षण संशोधन व विकास संस्था (DRDO), हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL), भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (BEL), भारत डायनॅमिक्स लिमिटेड (BDL) यांचे वार्षिक अहवाल, प्रेस माहिती ब्युरो (PIB) प्रसिद्धिपत्रके, नीती आयोगाचे अहवाल, स्टॉकहोम आंतरराष्ट्रीय शांतता संशोधन संस्था (SIPRI) यांचा डेटाबेस, तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समकक्ष-समीक्षित (Peer-reviewed) संशोधन नियतकालिकांतील लेख, पुस्तके आणि अधिकृत सरकारी दस्तऐवजांचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण, तुलनात्मक विश्लेषण आणि प्रवृत्ती विश्लेषण या पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. संरक्षण उत्पादन, संरक्षण निर्यात आणि स्वदेशीकरणाशी संबंधित आकडेवारीचे विश्लेषण तक्ते, आलेख आणि टक्केवारीच्या साहाय्याने करण्यात आले आहे. तसेच आत्मनिर्भर भारत अभियान राबविल्यानंतर भारताच्या संरक्षण धोरणात, संरक्षण उत्पादनात, संरक्षण निर्यातीत आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने झालेल्या बदलांचे गुणात्मक व चिकित्सक विश्लेषण करून त्याचे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

माहितीचे विश्लेषण

भारतातील संरक्षण उत्पादनातील प्रवृत्ती

तक्ता क्रमांक 1 वरून असे स्पष्ट दिसून येते की 2020–21 ते 2025–26 या कालावधीत भारताच्या संरक्षण उत्पादनात सातत्यपूर्ण वाढ झाली आहे. 2020–21 मध्ये संरक्षण उत्पादनाचे मूल्य ₹84,643 कोटी होते, ते 2025–26 मध्ये ₹1.78 लाख कोटींवर पोहोचले. म्हणजेच पाच वर्षांत उत्पादनात सुमारे 110% वाढ झाली आहे. ही वाढ आकस्मिक नसून संरक्षण क्षेत्रातील दीर्घकालीन धोरणात्मक सुधारणांचे परिणाम आहे.

तक्ता क्रमांक 1: आत्मनिर्भर भारत अभियानानंतर भारतातील संरक्षण उत्पादनातील वाढ

आर्थिक वर्ष	संरक्षण उत्पादन (₹ कोटी)	मागील वर्षाच्या तुलनेत वाढ (%)
2020–21	84,643	—
2021–22	94,846	12
2022–23	1,08,684	14.6
2023–24	1,27,434	17.3
2024–25	1,54,071	20.9
2025–26	1,78,000	15.6

स्रोत : Ministry of Defence (2026); Department of Defence Production; PIB.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

2020 नंतर संरक्षण मंत्रालयाने Positive Indigenisation Lists, DAP-2020, Make-I, Make-II, iDEX, SRIJAN Portal आणि संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर यांसारख्या उपक्रमांवर भर दिला. परिणामी, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांबरोबरच खाजगी उद्योग, MSMEs आणि स्टार्टअप्सचा सहभाग वाढला. यामुळे संरक्षण उत्पादनातील मूल्यवृद्धीबरोबरच देशांतर्गत औद्योगिक परिसंस्था अधिक मजबूत झाली. 2023–24 आणि 2024–25 मध्ये उत्पादनवाढीचा वेग अधिक असल्याचे दिसून येते. याचे प्रमुख कारण म्हणजे स्वदेशी संरक्षण प्रणाली, क्षेपणास्त्रे, रडार, दारुगोळा, नौदल प्रणाली आणि संरक्षण इलेक्ट्रॉनिक्सच्या उत्पादनात झालेली वाढ होय. या कालावधीत संरक्षण खरेदी धोरणामध्ये स्वदेशी उत्पादकांना प्राधान्य देण्यात आले, ज्यामुळे देशांतर्गत उत्पादन क्षमतेत लक्षणीय वाढ झाली.

त्यामुळे आत्मनिर्भर भारत अभियानामुळे संरक्षण उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे हे संशोधनाचे पहिले गृहीतक समर्थित होते.

भारताच्या संरक्षण निर्यातीतील प्रवृत्ती

तक्ता क्रमांक 2: भारताची संरक्षण निर्यात (2021–22 ते 2025–26)

आर्थिक वर्ष	संरक्षण निर्यात (₹ कोटी)	वार्षिक वाढ (%)
2021–22	12,815	—
2022–23	15,918	24.2
2023–24	21,083	32.4
2024–25	23,622	12
2025–26	38,424	62.7

स्रोत: Ministry of Defence, PIB (2026)

संरक्षण निर्यातीतील वाढ ही आत्मनिर्भर भारत अभियानाच्या यशाचे महत्त्वपूर्ण निर्देशक आहे. 2021–22 मध्ये ₹12,815 कोटी असलेली निर्यात 2025–26 मध्ये ₹38,424 कोटी झाली. या कालावधीत निर्यात जवळपास तीन पट वाढली. विशेषतः 2025–26 मध्ये 62.7% वाढ नोंदविण्यात आली, जी भारताच्या संरक्षण उद्योगासाठी ऐतिहासिक कामगिरी मानली जाते. ही वाढ ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली, आकाश क्षेपणास्त्र प्रणाली, संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स, रडार, नौदल उपकरणे आणि संरक्षण वाहनांच्या वाढत्या जागतिक मागणीमुळे झाली. भारताने आशिया, आफ्रिका, मध्यपूर्व आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांना संरक्षण साहित्य निर्यात करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे भारताची प्रतिमा संरक्षण आयातदार राष्ट्रापासून संरक्षण निर्यातदार राष्ट्राकडे बदलत आहे.

तुलनात्मक विश्लेषण

तक्ता क्रमांक 3 वरून आत्मनिर्भर भारत अभियानानंतर संरक्षण क्षेत्रात संरचनात्मक बदल झाल्याचे स्पष्ट दिसून येते. उत्पादन वाढण्याबरोबरच औद्योगिक परवान्यांमध्ये वाढ, MSMEs चा सहभाग आणि संरक्षण उद्योगातील खाजगी गुंतवणूकही वाढली आहे. यामुळे संरक्षण क्षेत्रात स्पर्धात्मक औद्योगिक परिसंस्था निर्माण झाली आहे.

तक्ता क्रमांक 3: आत्मनिर्भर भारत अभियानापूर्वी आणि नंतरची स्थिती

निर्देशक	2020 पूर्वी	2025–26
संरक्षण उत्पादन	₹84,643 कोटीपेक्षा कमी पातळी	₹1.78 लाख कोटी
संरक्षण निर्यात	मर्यादित	₹38,424 कोटी
MSMEs सहभाग	मर्यादित	16,000 पेक्षा अधिक MSMEs
औद्योगिक परवाने	तुलनेने कमी	462 कंपन्यांना 788 परवाने
संरक्षण खरेदी	आयातप्रधान	स्वदेशीकरणावर भर

स्रोत: Department of Defence Production (2025); PIB

SWOT विश्लेषण

SWOT विश्लेषणावरून भारताकडे मजबूत औद्योगिक पाया, सरकारी धोरणांचे पाठबळ आणि वाढती निर्यात ही प्रमुख बलस्थाने आहेत. तथापि, उच्च दर्जाच्या इंजिन, जेट प्रोपल्शन, सेमीकंडक्टर आणि काही महत्त्वाच्या संरक्षण तंत्रज्ञानासाठी परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबित्व अद्याप कायम आहे. भविष्यात संशोधन व विकास (R&D), कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा आणि अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानात अधिक गुंतवणूक केल्यास भारत जागतिक संरक्षण उत्पादनात अग्रगण्य स्थान मिळवू शकतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

बलस्थाने (Strengths)	कमकुवत बाजू (Weaknesses)	संधी (Opportunities)	धोके (Threats)
स्वदेशी उत्पादनात सातत्यपूर्ण वाढ	उच्च दर्जाच्या इंजिन व सेमीकंडक्टरसाठी आयातीवर अवलंबित्व	जागतिक संरक्षण बाजारपेठेत विस्तार	चीन, अमेरिका, रशिया यांच्याशी तीव्र स्पर्धा
DRDO व खाजगी उद्योगांची संशोधन क्षमता	R&D वरील तुलनेने कमी गुंतवणूक	AI, Drone, Robotics क्षेत्रातील प्रगती	भू-राजकीय अस्थिरता
संरक्षण निर्यातीत वाढ	काही प्रकल्पांमध्ये विलंब	संरक्षण स्टार्टअप परिसंस्था	जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्यय
मजबूत धोरणात्मक पाठबळ	प्रगत तंत्रज्ञान हस्तांतरणातील अडचणी	संरक्षण निर्यातीत वाढ	तंत्रज्ञान निर्बंध

निष्कर्ष

प्रस्तुत अभ्यासातून असे निष्पन्न होते की, आत्मनिर्भर भारत अभियानाने भारताच्या संरक्षण धोरणात स्वदेशीकरण, संरक्षण उत्पादन, संरक्षण निर्यात आणि धोरणात्मक स्वायत्तता यांना लक्षणीय चालना दिली आहे. संरक्षण क्षेत्रात राबविण्यात आलेल्या DAP-2020, Positive Indigenisation Lists, iDEX आणि इतर धोरणात्मक उपक्रमांमुळे संरक्षण उत्पादनात सातत्यपूर्ण वाढ, आयात अवलंबित्वात घट आणि संरक्षण निर्यातीत उल्लेखनीय वाढ झाल्याचे दिसून येते. तथापि, अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, संशोधन व विकास (R&D) आणि उच्च तंत्रज्ञानातील स्वावलंबनासाठी अधिक गुंतवणूक व संस्थात्मक बळकटीकरणाची आवश्यकता आहे. त्यामुळे आत्मनिर्भर भारत अभियान हे भारताच्या संरक्षण क्षेत्रातील दीर्घकालीन स्वावलंबन, राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक संरक्षण उद्योगातील स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी प्रभावी धोरणात्मक उपक्रम असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

References

1. Abhimanyu. (2024). Atmanirbhar Bharat in defence: Historical context and contemporary implications for India's strategic autonomy. International Journal of Social Impact, 9(4), 52–64. https://doi.org/10.25215/2455/0904008
2. Cowshish, A. (2024). Defence acquisition procedure for self-reliance. Journal of Defence Studies, 18(3), 79–96.
3. Government of India, Ministry of Defence, Department of Defence Production. (2020). Defence Production and Export Promotion Policy (DPEPP) 2020. Ministry of Defence.
4. Government of India, Ministry of Defence. (2020). Defence Acquisition Procedure (DAP) 2020. Ministry of Defence.
5. Government of India, Ministry of Defence. (2026). Defence exports skyrocket to record ₹38,424 crore in FY 2025–26. Press Information Bureau.
6. Government of India, Ministry of Defence. (2026). Defence production soars to a record ₹1.78 lakh crore in FY 2025–26. Press Information Bureau.
7. Government of India, Ministry of Defence. (2026). The Defence Decade: Enhanced capability, greater capacity, and stronger credibility. Press Information Bureau.
8. Rajiv, S. S. C. (2024). Defence public sector undertakings and exports: An assessment. Journal of Defence Studies, 18(3), 97–120.
9. Stockholm International Peace Research Institute. (2024). SIPRI Yearbook 2024: Armaments, Disarmament and International Security. SIPRI.
10. Wankhede, R. (2024). India's defence indigenisation programme: Opportunities and challenges. Journal of Defence Studies, 18(4), 45–68.